रे.के.नं.४७/२०१८
नि. क्र. ३२

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.७ ची जबानी
माझे नाव – विनोद सहदेव आंबेरकर
वय वर्षे – ४७, पद – पो.हे.कॉ./३६८
राहणार – चिपळूण पोलीस स्टेशन, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

**सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्रीम.एम.ए.दावत यांचेतर्फेर सुरु.**

मार्च २०१८ मध्ये पो.हे.कॉ. या पदावर चिपळूण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. दि.१७.०३.२०१८ रोजी पो. ठाणे अमंलदार भा.दं.वि.स.क. ३२४,३२३,५०४ व ५०६ प्रमाणे मोहन गणपत मेटकर यांचे कथनावरुन गुरनं.५०/२०१८ प्रमाणे गुन्हा नोंद करुन घेतला. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला. दुय्यम पो.ठाणे अंमलदार घाणेकर यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. तपास माझ्याकडे आल्यानंतर फिर्याद व घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले. त्यानंतर घटनेच्या अनुषंगाने साक्षीदारांकडे तपास केला. गुन्हयात वापरलेली कु–हाड जप्त करण्याची असल्याने आरोपीस अटक केली. आरोपीचे पंचासमक्ष निवेदन नोंदवून कलम २७ प्रमाणे निवेदन पंचनामा तयार केला. आता मला दि.१९.०३.२०१८ रोजीचा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३३** देण्यात येते. सदर पंचनामा करताना छायाचित्रे घेण्यात आली होती. आता माल पान क्र.८ वरील दोन छायाचित्रे दाखवण्यात आली. ती तीच आहेत. त्यास **आर्टिकल ड** देण्यात येते. तपासादरम्यान जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. गुन्हयात जप्त केलेल्या कु–हाडीच्या दांडयाने जखमीस मारहाण होवू शकते किंवा कसे याचा अभिप्राय मागवला. साक्षीदारांना देखील धकला बुकल झाली होती. त्यांचे देखील वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुराव आढळून आल्याने दोषारोप दाखल केले. निवेदन पंचनामा तयार करण्यासाठी ज्या शासकीय वाहनाचा वापर केला त्याचा तपशिल पान क्र.२१ वर दाखल केला आहे. आता मला तो

तपशिल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही व पोलीस स्टेशनचा शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.३४** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी हजर आहे. आता मला गुन्हयातील जप्त मुद्देमाल दाखवण्यात आला. तो तोच आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.व्ही.व्ही. शिगवण यांचे तर्फे सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपीमध्ये जमिन जागा, झाड व कंपाउंडवरुन पुर्वीपासून वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, मानसी महेंद्र मेटकर ही फिर्यादीची नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिचा तपास टिपण मी नोंदवला. आता मला साक्षीदार क्र.४ मानसी यांचा दि.१८.०३.२०१८ रोजीच्या तपास टिपणातील अधोरेखांकित भाग नि.२६ "सासरे मोहन मेटकर हे मोठयाने ओरडल्याचा आवाज.....गुरांचे गोठयाजवळ गेलो." इ. वाचून दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, अधोरेखांकित भाग नि.२६ सदर साक्षीदाराने तपास टिपण नोंदविताना सांगितला होता. आता मला नि.२५ कडील सरतपास दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर साक्षीदार उलटतपासादरम्यान तिला सुचित केलेला अधोरेखांकीत भाग नि.२६ पैकी आई सौ. मंजुळा यांच्या सोबत जाण्यापुरता मजकूर चुकीचा आहे असे कथन करते. हे म्हणणे खरे नाही की, सदर साक्षीदाराचे तपास टिपण तुम्ही साक्षीदाराच्या कथनाप्रमाणे नोंदविले नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदाराने तसेच संतोष मेटकरला आम्ही आवरण्याचा प्रयत्न केला असा मजकूर सांगितला. आता मला सदर साक्षीदाराचे तपास टिपण दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदाराच्या तपास टिपणामध्ये संतोष मेटकरला आवरण्याचा प्रयत्न केला असा मजकूर नमूद नाही. सदर साक्षीदाराने तपास टिपण नोंदवितेवेळी मला तसे सांगितले नाही. साक्षीदाराने ज्याप्रमाणे कथन केले त्याप्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, या कामी ज्या साक्षीदारांचे मी तपास टिपण नोंदविले आहे ते सर्व फिर्यादीचे नातेवाईक व एकाच घरातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अंकूश महाडीक हा फिर्यादीचा नातेवाईक आहे.

४.	घटनास्थळाच्या थोडया अंतरावर घरे आहेत. मला अंतर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या लागून अगदी ५० मी. अंतरावर घरे आहेत. घटनास्थळाच्या पुर्व दिशेला काशिराम घाणेकर यांचे ५०–६० मी. अंतरावर घर आहे किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळी मला त्रयस्थ साक्षीदार उपलब्ध होवू शकले असते. आता मला निवेदन पंचनामा नि.३३ दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, पान क्र.२ वर काही ठिकाणी खाडाखोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी मी माझी स्वाक्षरी केली नाही.

५.	या कामी जप्त केलेली कु–हाडीसारखी कु–हाड कोकणामध्ये प्रत्येक शेतक–याच्या घरी असते किंवा कसे ते मला सांगता येणार नाही. आता मला नि.३३ दाखवण्यात आला. त्यावरील मेमोरंडम पंचनामा व त्यापाठीमागे लिहीलेला मेमोरंडम पंचनामा असा एकच कागद आहे असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, निवेदन पंचनामा नि.३३ पान क्र.१ वर मला पंचांचे नाव, वय व पत्ता लिहीणे शक्य होते. हे म्हणणे खरे आहे की, परंतु, पान क्र.१ वर तसे मी नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा नि.३३ मधील तारीख व वेळेमध्ये शाई वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मी कथन करतो त्याप्रमाणे मला कोणतेही निवेदन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या निवेदना आधारे कोणतीही कु–हाड व मी म्हणतो तसा मुद्देमाल मिळून आला नाही.

६.	हे म्हणणे खरे नाही की, मी नमुद करतो त्याप्रमाणे जप्त कु–हाडीच्या पुढे कोणताही दांडा नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला जी काही जखम झाली ती तो पडल्यामुळे झाली. हे म्हणणे खरे नाही की, सदोष तपास करुन खोटे दोषारोप दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण

दिनांक – १३/११/२०२५
चिपळूण.

## - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | १३.११.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १३.११.२०२५ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | १३.११.२०२५ |